**ठळक बातम्या**

- पेट्रोरासायनिक उत्पादनांवरचं सीमाशुल्क तात्पुरतं रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
- २०२५-२६ या आर्थिक वर्षात संरक्षण उत्पादनांची ३८ हजार ४२४ कोटी रुपये इतकी विक्रमी निर्यात
- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस
- राज्यात ठिकठिकाणी हनुमान जयंतीचा उत्साह

**आणि**

- राज्याच्या विविध भागात येत्या २ दिवसात गारपीट आणि वादळी पावसाची शक्यता /१३ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने पेट्रोरासायनिक उत्पादनांवरचं सीमाशुल्क तात्पुरतं रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. ही सवलत येत्या ३० जूनपर्यंत लागू राहील. प्लास्टिक, वेष्टनं, औषधं, रसायनं, वस्त्रं, वाहनांचे सुटे भाग, खतं आणि इतर औद्योगिक उत्पादनांमधे वापरली जाणारी रसायनं, अशा विविध उत्पादनांचा यात समावेश आहे. सध्याच्या भूराजकीय संघर्षाचा परिणाम जागतिक पुरवठा साखळीवर झाला असून त्याचा फटका सामान्य ग्राहकांना बसू नये या हेतूनं सध्या ही सवलत दिल्याचं केंद्रीय अर्थमंत्रालयानं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्ली इथं केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची विशेष बैठक झाली. प्रधानमंत्र्यांच्या

निवासस्थानी झालेल्या या बैठकीत पश्चिम आशियातल्या संघर्षस्थितीच्या पार्श्वभूमीवर, भविष्यातल्या उपक्रमांविषयी चर्चा झाली, तसंच विविध मंत्रालयं, विभागांनी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. या संदर्भातली ही दुसरी बैठक होती.

<><><><><>

भारतानं २०२५-२६ या आर्थिक वर्षात संरक्षण सामुग्री उत्पादनांची ३८ हजार ४२४ कोटी रुपयांची विक्रमी निर्यात केली असून, गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यामध्ये १४ हजार ८०२ कोटी रुपये, म्हणजेच ६२ पूर्णांक ६६ शतांश टक्के इतकी वाढ झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. यात सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रमांचा वाटा ५४ पूर्णांक ८४ शतांश टक्के, तर खासगी क्षेत्राचा वाटा ४५ पूर्णांक १६ शतांश टक्के आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या कामगिरीची प्रशंसा केली आहे.

<><><><><>

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस आहे. अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभार प्रस्ताव संमत झाला तसंच २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प मांडण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात, संसदेत वित्त विधेयक २०२६ आणि विनियोग विधेयक २०२६ याला मंजुरी मिळाली. या काळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये पश्चिम आशियामधल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर सरकारची भूमिका मांडली.

<><><><><>

ग्राहकांना विजेचा प्रीपेड मीटर बसवणं अनिवार्य नसल्याचं ऊर्जामंत्री मनोहर लाल खट्टर यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. सरकार खासगी कंपन्यांप्रमाणेच ग्राहकांना प्रीपेड मीटर स्वीकारण्याची सक्ती करत असल्याचा दावा

त्यांनी फेटाळला. मात्र, विजेचं बिल वारंवार थकवणाऱ्यांना 'प्री-पेड मीटर' पद्धत स्वीकारावी लागेल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

ऑटिझम, म्हणजेच ‘स्वमग्नता’ असलेल्या व्यक्तींना केवळ समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणं पुरेसं नसून, त्यांना देशाचे सन्माननीय नागरिक म्हणून सक्षम बनवणं, ही आपली आपली सामायिक जबाबदारी असल्याचं राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्रांनी २ एप्रिल हा दिवस जागतिक ऑटिझम जागृती दिवस म्हणून निश्चित केला आहे. त्या निमित्त ते आज राज्यसभेत बोलत होते. ऑटिझम असलेल्या व्यक्तींचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणाला चालना देण्यासाठी संसद वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

देशातलं दळणवळणाचं सर्वात प्रभावी माध्यम म्हणून भारतीय टपाल विभागानं यशस्वी वाटचाल केली असून, २०३० पर्यंत जागतिक स्तरावरही भारतीय टपाल सेवा आपला वेगळा ठसा उमटवेल असा विश्वास केंद्रीय दळणवळणमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी व्यक्त केला आहे. सहारनपूर इथल्या टपाल विभागाच्या प्रशिक्षण केंद्राला ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त नवी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी प्रशिक्षण केंद्राच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशनही केलं.

**<><><><><>**

विकसित भारताची उभारणी कुशल आणि समर्पित मनुष्यबळाच्या आधारावर होणार असून, ‘ईझ ऑफ लिव्हिंग, म्हणजेच ‘जीवन सुलभता' आणि जीवनाचा दर्जा उंचावणं, हेच प्रशासनाचं प्रमुख उद्दिष्ट असायला हवं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज ‘कर्मयोगी साधना सप्ताह २०२६’ या कार्यक्रमाला

व्हिडीओ संदेशाद्वारे संबोधित करत होते. आजचं प्रशासन 'नागरिक देवो भव' या मंत्राने प्रेरित असून, सार्वजनिक सेवा अधिक सक्षम, संवेदनशील आणि नागरिक-केंद्रित करण्यावर यात स्पष्ट भर देण्यात आल्याचं ते म्हणाले.

**'होल्ड बाईट (11.02.57)' - प्रधानमंत्री**

**<><><><><>**

राज्यात आज हनुमान जयंती उत्साहात साजरी केली जात आहे. पहाटे जन्मोत्सव साजरा केल्यानंतर भाविकांनी ठिकठिकाणच्या मंदिरांमध्ये दर्शनासाठी गर्दी केली आहे. समर्थ रामदास यांनी स्थापन केलेल्या ११ मारुती मंदिरांमधे तसंच गावोगावी हनुमान मंदिरांमधे उत्सवाचं आयोजन केलं आहे.सांगली जिल्ह्यात बहे, तुंग आणि पुणदीसह अनेक ठिकाणी हनुमान जयंती भक्तिमय वातावरणात साजरी होत आहे. सोलापूर जिल्ह्यातल्या गौडगावच्या जागृत दक्षिणमुखी मारुती मंदिरात हनुमान जयंती उत्सव साजरा होत असून इथं विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. आज सकाळी पारंपरिक वाद्यांच्या गजरात पालखी काढण्यात आली.
गोंदिया शहरातल्या हनुमान मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. या मंदिरात हनुमानाची निद्रावस्थेतील मूर्ती असून राज्यातली ही दुसरी मूर्ती आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि गृहमंत्री अमित शहा यांनी देशवासियांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही हनुमानजयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

भोंदूबाबा अशोक खरातला नाशिकच्या न्यायालयाने आज एका गुन्ह्यामध्ये येत्या ८ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी दिली. खरातवर अनेक गुन्हे दाखल असून त्याला तीन वेळा पोलीस कोठडी मिळाली होती त्यानंतर काल एका प्रकरणात त्याला १४

न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. मात्र, दुसऱ्या एका प्रकरणात आज पोलिसांनी त्याला हजर केल्यावर सत्र न्यायाधीशांनी ८ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडीचे आदेश दिले.

**<><><><><>**

‘सर्च’, अर्थात ‘सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन अँड रिसर्च’, या संस्थेच्या संचालकपदावर डॉ.आनंद बंग यांची निवड झाली आहे, तर ‘निर्माण’ या संस्थेच्या संचालकपदावर अमृत बंग यांची निवड झाली आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग यांनी  स्थापन केलेल्या ‘सर्च’ या संस्थेने लोकसहभागातून आरोग्यसेवा आणि संशोधन, यामधून जागतिक पातळीवर ठसा उमटवला आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या ‘एक खिडकी प्रणाली २.०’ या अभिनव उपक्रमाला प्रतिष्ठेचा ‘स्कॉच गोल्ड पुरस्कार’ मिळाला आहे. नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<><><><><>**

मार्च महिन्यात युपीआयद्वारे सुमारे २२ अब्ज ६४ कोटी रुपयांच्या व्यवहारांची नोंद झाल्याची माहिती  वित्तीय सेवा विभागानं समाज माध्यमावरून दिली.

**<><><><><>**

राज्यात विविध ठिकाणी आज आणि उद्यासाठी वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, बीड, जालना, पुणे, परभणी, हिंगोली, धाराशीव, लातूर छत्रपती संभाजीनगर या१३ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमधे तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे.

संपूर्ण विदर्भ, पालघर, मुंबई, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर वगळता पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणासाठी हवामान विभागानं यलो अलर्ट जारी केला आहे. येत्या दोन दिवसात धुळे, नाशिक, जळगाव या उत्तर महाराष्ट्रातल्या तीन जिल्ह्यांनाही यलो अलर्ट दिला आहे.

**//<><><><><>//**